KJ's Educational Institutes

TRINITY COLLEGE OF ENGINEERING & RESEARCH

LIBRARY DEPARTMENT

**NEWS PAPER CLIPPING**

**Date: 19th Dec 2018.** **Day –Wednesday** **Paper-Navrashtra** **Page No. Pune 2**

# 'इंटर्नशाला'मुळे विद्यार्थ्यांचा विकास

**पुणे :** अभियांत्रिकीमधील वाढत्या नोकरी-व्यवसायाच्या स्पर्धेमध्ये उतरणे आणि टिकून राहणे, हे एक खूप मोठे आव्हान बनले आहे. अशा परिस्थितीत औद्योगिक व व्यवहारिक ज्ञानाबरोबरच विद्यार्थ्यांना कौशल्याचे शिक्षण मिळणे क्रमप्राप्त झाले आहे. विद्यार्थ्यांतील कौशल्य वाढविण्याकरिता 'इंटर्नशाला' संस्थेने पुढाकार घेतला असून, ट्रिनिटी अभियांत्रिकी व संशोधन महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना याचा लाभ होईल, असे मत केजे एज्युकेशनल इन्स्टीट्युटचे संस्थापक अध्यक्ष कल्याण जाधव यांनी व्यक्त केले. येवलेवाडी येथील केजे एज्युकेशनल इन्स्टीट्युटच्या ट्रिनिटी महाविद्यालयात बदलते तंत्रज्ञान कौशल्य पुरविणाऱ्या 'इंटर्नशाला' या ऑनलाईन (वेब) इंटर्नशीप आणि प्रशिक्षण व्यासपीठाद्वारे आयोजित कार्यशाळेत कल्याण जाधव बोलत होते. याप्रसंगी संचालक डॉ. व्ही. जे. काखंडकी, कार्यकारी संचालक डॉ. एच. के अभ्यंकर, प्राचार्य डॉ. एच. जी. फाकटकर, मॅकेनिकल विभागाचे प्रमुख डॉ. बी. एम. शिंदे आणि प्राध्यापक एम. जे. घाडगे आदी उपस्थित होते. ट्रिनिटी अभियांत्रिकी आणि संशोधन महाविद्यालयातील तालिब शेख या विद्यार्थ्याची 'इंटर्नशाला कॅम्पस ॲम्बेसेडर' म्हणून निवड झाली आहे. त्याबद्दल त्याचे कौतुक करण्यात आले.